मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विसर्जन मिरवणुसाठी पोलिसांचे चोख नियोजन : विनयकुमार चौबे

## नागरिकांनी नियमांचे पालन करावे : कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी सहकार्य करावे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड सारख्या महाविस्तीर्ण शहरातील कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी शहर पोलिसांकडून दिवसरात्र परिश्रम घेतले जातात. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत सर्वधर्मीय नागरिकांचे वास्तव्य आहे.

तसेच सर्वच धर्मीय नागरिक त्यांचे सण समारंभ एकत्रितपणे मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरे करत असतात. त्यामुळे याकाळात कायदा सुव्यवस्था राखणे, शांतता राखणे आणि निर्विघ्नपणे सण समारंभ पार पाडण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर असते.

याअनुषंगाने आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी, गणेशोत्सव आणि विसर्जन मिरवणूक निर्विघ्नपणे आणि शांततेत पार पडावी, यासाठी पोलिसांनी चोख नियोजन केल्याचे दैनिक प्रभातशी बोलताना सांगितले.



गणेश विसर्जन मिरवणूक आता तोंडावर आली आहे. उत्सवाचे अवघे दोन दिवस बाकी असून संपूर्ण गणेशोत्सव जसा शांततेत पार पडला तसाच विसर्जन मिरवणुकीचा सोहळा देखील निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी पोलिसांनी सूक्ष्म नियोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

विसर्जन काळात वरिष्ठ पोलीस अधिकारी यांसह एकूण ५००० पोलीस कर्मचारी तैणात केले जाणार असल्याची महत्वाची माहिती आयुक्त चौबे यांनी दिली. यासह अनेक सामाजिक संस्थाचेही स्वयंसेवकांचे सहकार्य लाभणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### गणरायाला साकडे

» पिंपरी-चिंचवड हे औद्योगिक शहर आहे. या शहरातील उद्योग जोमात चालावेत, उद्योगांची संख्या वाढावी, पर्यायाने रोजगारही वाढतील. तसेच सर्व पिंपरी-चिंचवडकरांना सुख-समृद्धी मिळावी, असे साकडे गणरायाला घातले असल्याचे आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितले.

### नागरिकांनी नियमांचे पालन करावे

» सध्या सुरू असलेला गणेशोत्सव, तसे आगामी सर्व सण समारंभ, इतर धर्मीयांचे सण समारंभ या सर्व काळात नागरिकांनी नियमांचे पालन करावे कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त विनयकुमार चौबे यांनी नागरिकांना केले. कोणालाही त्रास होईल, असे वर्तन करु नये. यासह समाजकंटकांकडून त्रास होत असल्यास तातडीने ११२ क्रमांकावर संपर्क साधावा, पोलीस सदैव आपल्या सेवेसाठी तत्पर आहेत, असे देखील आयुक्त विनयकुमार चौबे यांनी सांगितले.

# मोशी, डुडुळगावचा चेहरा मोहरा बदलणार : अजित गव्हाणे

## सोसायटी धारकांशी संवाद, परिवर्तनाचा दिला नागरिकांना विश्वास

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वात जास्त 'डेव्हलपमेंट' डुडुळगाव परिसरात होत आहे. मोशी, डुडुळगाव तसेच लगतच्या चऱ्होली या गावांचे क्षेत्र शहरात सर्वात मोठे आहे. विकास आराखड्यातील मंजूर रस्ते, शैक्षणिक संस्था, पाण्याची उपलब्धता, दळणवळणाच्या सुविधा हे सर्व काही असताना योग्य नियोजन अभावी हा भाग पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांपासून आजही वंचित राहिला आहे. त्यामुळे शहरातील सर्वात जास्त "पोटेन्शियल" असलेला हा परिसर तुलनेने मागे पडला आहे. या भागाला प्राधान्याने योग्य नियोजन देत मोशी, डुडुळगावचा चेहरा मोहरा बदलणार असल्याचे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी सांगितले. तसेच येथील नागरिकांनीही प्रगतीच्या वाटेने जाण्यासाठी 'परिवर्तन' करणार असल्याचा विश्वास दिला.

मोशी, डुडुळगाव परिसरात (दि.15) स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांनी विविध सोसायटी धारकांशी संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी नगरसेवक लक्ष्मण



सस्ते, मंदा आल्हाट, युवा नेते नितीन सस्ते, प्रदीप तापकीर, तानाजी तळेकर, सागर बोराटे, अनिल कुदळे, मोरेश्वर आल्हाट, किरण तळेकर, आकाश बनकर, आप्पासाहेब सस्ते, विशाल सस्ते, सूरज कुदळे ,निलेश बोरकर, सागर बनकर, दयानंद सस्ते, संजय तापकीर, निखिल सस्ते, निखिल बोराटे, प्रकाश आल्हाट, विशाल सस्ते, भानुदास सस्ते, हरीश कुदळे, मयुर कुदळे, दत्ता आल्हाट, केतन हवालदार तसेच पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. अजित गव्हाणे यांनी केसर ट्री टाऊन, इनफ्लिनिटी प्लॅनेट, डेस्टिनेशन ऑस्टीया, स्टेला, आरंभ, वंदे मातरम, मंगलम ब्रिज, मंगलम पॅराडाईज् ,अमूल्यम सोसायटी, वेंचर सिटी, गोविंद बाग, शामा इस्टेट आदी सोसायटीमध्ये संवाद साधला.

यावेळी सोसायटी धारकांनी रस्त्यावरील अतिक्रमणे, खड्डे, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, विस्कळीत असणारा पाणीपुरवठा याबाबत अक्षरशः तक्रारींचा पाढा अजित गव्हाणे यांच्यासमोर वाचला. सर्वात वेगाने डेव्हलप होणारा परिसर असूनही पाणी, वीज यांसारख्या मूलभूत गोष्टींसाठी नाहक त्रास सहन करावा लागतो असेही सोसायटी धारकांनी सांगितले.

# माजी नगरसेवक संदीप कस्पटेंचा भाजपचा राजीनामा, भाजपमध्ये गळती सुरु

## पिंपरी चिंचवड शहर भाजपमधील सुंदोपसुंदी उफाळून आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभेत शहराध्यक्ष शंकर जगताप यांना उमेदवारी दिली तर १५ नगरसेवक पक्षातून बाहेर पडणार असा इशारा देण्यात आला होता, त्याचाच पहिला अंक आज पार पडला. वाकड प्रभागात ज्यांनी भाजपचे प्रस्थ वाढवले, त्या अत्यंत दमदार अशा माजी नगरसेवक संदीप कस्पटे यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लेखी पत्र पाठवत त्यांनी भाजपला रामराम केला आहे. अशा प्रकारे आणखी १५-१६ माजी रथीमहारथी नगरसवेक भाजप सोडण्याच्या मनस्थितीत आहेत.

वाकडमध्ये २०१४ ला भाजपमध्ये प्रवेश केला होता. महापालिका निवडणुकीत भाजपचे चार सदस्यांचे पॅनल विजयी केले. आरती चोंधे, ममता गायकवाड, तुषार कामठे हे त्यांच्या पॅनलमध्ये विजयी झाले होते. कामठे यांनी पक्षातील एकाधिकारशाहीला



कंटाळून राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार या पक्षात प्रवेश केला आणि आता ते त्या पक्षाचे शहराध्यक्ष आहेत. पाठोपाठ संदीप कस्पटे यांनी भाजप सोडल्याने वाकड, रहाटणी, काळेवाडी पट्यात भाजपला मोठा फटका बसणार आहे. माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, रहाटणी-काळेवाडीचे चंद्रकांत नखाते यांनीही भाजप सोडल्यात जमा आहे.

मी आजच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्याकडे माझा राजीनामा पाठविली आहे. शहराध्यक्षांच्या कारभाराला वैतागुन मी राजीनामा देत असल्याचे त्यात म्हटले आहे. अशा प्रकारे राजीनामा देणार असल्याचे आम्ही वारंवार नेत्यांना सांगितले होते, पण त्यांनी गांभीर्याने घेतले नाही असे संदीप कस्पटे यांनी पीसांगितले.

आगामी विधानसभा निवडणुकित पक्षाचे शहराध्यक्ष शंकरशेठ जगताप यांना उमेदवारी दिली तर आम्ही १४-१५ नगरसवेक पक्ष सोडणार असल्याचा इशारा माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्यासह सर्वांनी पत्रकार परिषदेत दिला होता.

# पर्यावरणाचा देखावा अन् पुस्तकांची आरास

## पर्वती येथील रत्नाकर जोशींनी सादर केला विमानतळाचा देखावा, वडगाव शेरीत पर्यावरणाच्या संदेशासाठी विविध रोपांची आरास!

**पुणे | प्रतिनिधी**

पर्वती येथील रत्नाकर जोशी यांनी लोहगाव विमानतळाचा देखावा घरगुती गणपती समोर सादर केला आहे. वडगाव शेरी येथील रघुनाथ जगताप यांनी गणपती समोर विविध पानाफुलांच्या रोपांची आरास केली आहे.


पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) मधील निवृत्त कर्मचारी रत्नाकर जोशी यांनी पर्वती येथील घरात विमानतळाचा देखावा सादर केला आहे. यात विमानतळ टर्मिनल, रन वे, विमाने ठेवली आहे. हँगर, वाहनतळ देखाव्यात सादर केले आहे. वडगाव शेरी येथील रघुनाथ जगताप यांनी घरच्या गणपती समोर पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी विविध प्रकारची रोपे लावली आहेत. जगताप गेली वीस वर्षे घरगुती गणपतीजवळ रोपांची आरास करतात.

पर्वती येथील रत्नाकर जोशी यांची मोटारींची दुनिया निराळीच आहे. त्यांच्याकडे २२५ मोटारींच्या प्रतिकृती आहेत. यापैकी १७५ परदेशी बनावटीच्या तर ५० भारतीय बनावटीच्या आहेत. १९२३ सालच्या फोर्ड बनावटीचे ट्रकपासून ते सध्याच्या बीएमडब्ल्यूपर्यंतच्या प्रतिकृती आहेत. मर्सिडिस बेंझ , फोर्ड, हमर, कूपर, फेरारी, जॅग्वार ऑडी या परदेशी तर बनावटीच्या कार तर मारुती, हिंदुस्थान मोटर्स, महिंद्रा, टाटा कंपनीच्या भारतीय बनावटीच्या कार आहेत. त्याचबरोबर सुझुकी, होंडा, बजाज कंपनीच्या दुचाकींच्या प्रतिकृती आहेत.

जोशी यांनी घरात शहरातील वाहतूक कोंडी हा देखावा सादर केला होता. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. यामध्ये त्यांनी वेगवेगळे रस्ते, वाहनांमुळे होणारे प्रदूषण, वाहतुकीचे नियम देखाव्यात सादर केले होते. आता त्यांनी विमानतळाचा देखावा सादर केला आहे. या देखाव्यात विमानतळ टर्मिनल, विमानाचे लँडिंग आणि टेक ऑफ, विमाने पार्क केली जातात ते हँगर , विमानतळासमोरील रस्ता, रस्त्यावरील वाहने, विमानतळाजवळील इमारती आदी देखाव्यात दाखविण्यात आले आहे. हा देखावा पाहण्यासाठी त्यांच्या घरी आबालवृद्धांची गर्दी होत आहे.

वडगाव शेरी येथील अरुणा निवास या ठिकाणी रघुनाथ जगताप यांचा बंगला आहे. सुमारे पाच हजार चौरस फुटामध्ये फुलझाडांची विविध प्रकार पाहायला मिळतात. जगताप यांच्या बागेत ८० टक्के झाडाच्या कांड्या आणून फुलझाडे आणि फळझाडे तयार केली आहेत. दहा टक्के कलम केलेली तर काही बियांपासून उगवलेली रोपे फुलझाडे आणि फळझाडे आहेत. यामध्ये संत्रा, चिक्कू, आंबा ही फळे लक्ष वेधून घेतात. नेपाळमध्ये पशुपतीनाथ येथील पंचमुखी रुद्राक्षाचे सर्वात उंच झाड असून वर्षातून दोनदा रुद्राक्ष येत असल्याचे जगताप यांनी सांगितले.

जगताप यांच्या बंगल्यात दोन ते तीन गुंठ्यात विविध प्रकारची झाडे आहेत. त्यामुळे जगताप दरवर्षी गणपतीच्या आरासमध्ये विविध प्रकारची फुलझाडे आणि फळझाडे ठेवतात. शहरीकरणामुळे कॉंक्रिटच्या जंगलात जगताप यांनी फूल आणि फळझाडांचे नंदनवन फुलवले आहे. त्यांच्या बंगल्यातच नाही तर बाहेरसुद्धा विविध प्रकाराची झाडे आहेत. हा परिसर हिरवागार दिसतो.




### कर्वेनगर भागातील पुस्तकांची आरास चर्चेत

» कर्वेनगर भागातील मोरया मित्र मंडळाने केलेली पुस्तकांची आरास परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे. पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. तसेच पुण्याचा सार्वजनिक गणेशोत्सवदेखील जगभरात प्रसिद्ध आहे. या शहरातील गणेश मंडळे कल्पक देखावे साकारून गणेशोत्सव साजरा करत असतात. असाच एक आगळावेगळा देखावा कर्वेनगर आणि कोथरूडमध्ये सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या मोरया मित्र मंडळाने सादर केला आहे. 'बुद्धीच्या देवतेला विद्येची आरास' या नावाने हा देखावा साकारला असून, किताबवाला आणि नागरिकांमार्फत पुस्तके जमा करून श्री गणेशाला पुस्तकांची आकर्षक आरास केली आहे. तसेच सर्व प्रकारची वर्तमानपत्रे लावण्यात आली आहेत. वाचनाबद्दल जनजागृती व्हावी, या उद्देशाने घोषवाक्यांचे फ्लेक्सदेखील लावले आहेत.

> वाचनाबद्दल जनजागृती व्हावी म्हणून हा देखावा मंडळाने साकार केला आहे. नवीन पिढीमध्ये मोबाइलचे वेड जास्त आहे. ती पिढी वाचनाकडे वळवणे गरजेचे आहे. त्यासाठी गणेशोत्सव हे उत्तम माध्यम आहे, म्हणून हा उपक्रम राबवला आहे.
>
> **- केदार मारणे, संस्थापक, मोरया मित्र मंडळ.**

> बागकाम करताना मोठे मानसिक समाधान मिळते. निसर्गाच्या सानिध्यात फिरण्याचा आनंद मिळतो. बागेतील झाडे बहरताना पाहिले की सारे दुःख विसरले जाते. ५० वर्षे या वृक्षांच्या सानिध्यात असल्यामुळे वयाच्या ८८ व्या वर्षी सुद्धा मधुमेह, रक्तदाब किंवा कोणताही आजार नाही. त्यामुळे गणरायासाठी पानाफुलांच्या रोपांची आरास केली आहे.
>
> **- रघुनाथ जगताप, वृक्षमित्र.**

---

# पुण्यातील वनराज आंदेकर हत्या प्रकरणातील आरोपींवर मोक्कांतर्गत कारवाई

## एकूण 22 आरोपींवर पुणे पोलिसांकडून मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्षणाचे माहेरघर मानल्या जाणाऱ्या पुण्यात मागच्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली आहे. ड्रग्ज, हत्या, गोळीबाराच्या घटनांनी पुणे हादरून गेले आहे. या घटनांमुळे पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले. काही दिवसांपूर्वी पुण्यात माजी नगरसेवकाचा भररस्त्यात खून करण्यात आला होता. या प्रकरणात आता एक मोठी अपडेट आली आहे.

वनराज आंदेकर खून प्रकरणातील सर्व आरोपींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली असून एकूण 22 आरोपींवर पुणे पोलिसांकडून मोक्का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज सूर्यकांत आंदेकर (वय 40) यांच्या खूनप्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. यामुळे गुन्हेगारांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

पुण्यातील नाना पेठेत 14 ते 15 हल्लेखोरांनी दुचाकीवर येऊन चौकात मित्रासोबत उभे असलेल्या वनराज आंदेकर यांच्यावर हल्ला केला. यावेळी, थेट वनराज यांच्या अंगावर धावून जात आरोपींनी गोळीबार करण्यास सुरुवात केली. काहीजण कोयता घेऊन त्यांच्या अंगावर गेले. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार वनराज आंदेकर यांना पाच राऊंडपैकी एक देखील गोळी लागली नाही. मात्र, गोळीबारानंतर त्यांच्यावर धारदार शस्त्रानं हल्ला करण्यात आला त्यातच वनराज आंदेकर यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले. घरगुती संपत्तीच्या वादातूनच ही हत्या झाल्याचे समोर आले आहे.



---

# रोझ व्हॅली सोसायटीतील स्वयंचलित लिफ्टचे नाना काटे यांच्या हस्ते उद्घाटन

## सोसायटीमध्ये विविध पर्यावरणपूरक प्रकल्प राबविले असून ते यशस्वीपणे कार्यरत आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील रोझ व्हॅली सोसायटीतील रहिवाशांनी सोसायटीमध्ये विविध पर्यावरणपूरक प्रकल्प राबविले असून ते यशस्वीपणे कार्यरत आहेत. यापैकी एक उपक्रम म्हणजे स्वयंचलित लिफ्टची स्थापना, ज्यामुळे समाजासाठी ३० टक्के वार्षिक ऊर्जा बचत अपेक्षित आहे. ज्यामुळे आर्थिक भार कमी होईल आणि लक्षणीय बचत होईल. या प्रकल्पाचे उद्घाटन १५ सप्टेंबर रोजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, नगरसेविका शीतल ताई नाना काटे आणि पिंपरी चिंचवड शहर पोलीस उपायुक्त माधुरी कांगणे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान, समिती सदस्यांनी इतर उपक्रमांची आणि सोसायटीने सुरू असलेल्या प्रकल्पांचीही माहिती दिली. नाना काटे यांनी या उपक्रमात स्वारस्य दाखवून पाहणी केली.

महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक म्हणजे सौर ऊर्जा प्रणालीची स्थापना, सध्या अंतिम टप्प्यात आहे. एकदा कार्यान्वित झाल्यानंतर, या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे सोसायटीच्या वीज खर्चात वार्षिक वीस लाख रुपये बचत होण्याची अपेक्षा आहे. मासिक देखभाल शुल्काव्यतिरिक्त या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त खर्चास रहिवाशांनी कोणताही आक्षेप न घेता एकमताने मंजुरी दिली आहे. नाना काटे यांनी समिती सदस्यांचे त्यांच्या निर्णयाबद्दल आणि पर्यावरण आणि ऊर्जा संवर्धनासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि त्यांचे अभिनंदन केले.

गेल्या पंधरा वर्षांपासून या सोसायटीला पाण्याची समस्या भेडसावत असून, त्यामुळे उन्हाळ्यात महिन्याला लाखांचा खर्च येतो. ही बाब ओळखून नाना काटे यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत सोसायटीसाठी नवीन पाणी कनेक्शनसाठी पाठपुरावा केला, त्याला आता मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे सोसायटीचे दरमहा लाखांची बचत होणार आहे. नाना काटे यांच्या प्रयत्नांमुळे, रहिवाशांनी त्यांचे आणि शीतल ताई काटे यांचे कृतज्ञता आणि कौतुक व्यक्त केले.



# गणपती विसर्जनासाठी पिंपरी पोलिसांचा तगडा बंदोबस्त

## पिंपरी शहरात विसर्जन मिरवणुकीत 3200 पोलिसांचा तगडा बंदोबस्त राहणार : दुपारी चार वाजल्यापासून वाहतुकीत बदल

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहर आणि परिसरातील उद्या (मंगळवारी १७ सप्टेंबर) होणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुकांसाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. त्यानिमित्त विसर्जन घाटांसह ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवला जाणार आहे. विसर्जन मिरवणुकीत ३२०० पोलिसांचा तगडा बंदोबस्त राहणार आहे. दुपारी चार वाजल्यापासून पिंपरी आणि चिंचवड मधील वाहतुकीत बदल असणार आहे.



पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २०१४ सार्वजनिक गणेश मंडळांनी 'श्रीं'ची प्रतिष्ठापना केली. त्यातील सांगवी, तळेगाव दाभाडे यासह काही ठिकाणी सातव्या दिवशी गणेश मंडळांच्या गणपतींचे विसर्जन झाले आहे. उर्वरित सार्वजनिक मंडळांसह घरगुती गणपतींचे मंगळवारी विसर्जन होणार आहे. त्यानिमित्त, आयुक्तालयाकडून बंदोबस्तासाठी नियोजन करण्यात आले आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वत्र भव्य विसर्जन मिरवणुका निघत असल्याने ठिकठिकाणी गर्दी असते. चिंचवडगावातील चापेकर चौक व पिंपरीतील शगुन चौक या मार्गांवरून मोठ्या संख्येने अनेक गणेश मंडळे मार्गस्थ होतात. तसेच, शहरासह इतर भागांतही मिरवणुकीचे भव्य नियोजन केले जाते. यासह विसर्जन घाटांवरही भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात. मोठ्या उत्साहात लाडक्या गणरायाला निरोप दिला जातो. या दरम्यान, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून ठिकठिकाणी बंदोबस्त नेमण्यात येणार आहे. वरिष्ठ अधिकारी सर्व हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. ५३ पोलीस निरीक्षक, २४५ सहायक पोलीस निरीक्षक आणि फौजदार, २४४० पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड, एक एसआरपीएफ कंपनी, बॉम्ब शोधक आणि नाशक (बीडीडीएस) पथक, ११ आरसीपी स्ट्रायकिंग एवढा बंदोबस्त सज्ज आहे.

### चिंचवडमधील वाहतुकीत बदल

चिंचवडमधील वाहतुकीत दुपारी चार ते रात्री बारा वाजेपर्यंत बदल असणार आहे. अहिंसा चौक ते चापेकर चौकाकडे जाणारा मार्ग बंद राहणार असून ही वाहतूक एसएएफ चौकातून खंडोबा माळ मार्गे वळविण्यात येणार आहे. दळवीनगर पुलाकडून चापेकर चौकाकडे जाणारा मार्ग बंद राहणार असून ही वाहने एसकेएफ चौकाकडून बिजलीनगर मार्गे जातील. वाल्हेकरवाडी टी जंक्शनकडून चापेकर चौकाकडे जाण्यास बंदी असून वाल्हेकरवाडी जुना जकात नाका डावीकडे वळून जैन शाळेपासून बिजलीनगर अथवा एसकेएफ-खंडोबा माळ मार्गे जाता येईल. लिंकरोडवरून चापेकर चौकातील पीएमटी बस थांबा येथून चापेकर चौकात जाण्यास बंदी असून लिंकरोडने डावीकडे वळून काळेवाडी मार्गे पुढे जाता येईल. भोई आळी तसेच चिंचवड चौकी येथून चापेकर चौकात जाण्यास बंदी असून केशवनगर मार्गे पुढे जाता येईल. चिंतामणी चौक-वाल्हेकरवाडी रिव्हर व्ह्यू चौकाकडे जाण्यास वाहनांना बंदी असून चिंचवडेफार्म वाल्हेकरवाडी पूल रावेत मार्गे पुढे जाता येईल.अहिंसा चौक व रिव्हर व्ह्यू चौकाकडून चापेकर उड्डाणपुलावरून जाण्यास बंदी असून रिव्हर व्ह्यू चौकाकडून वाल्हेकरवाडी मार्गे अथवा अहिंसा चौक ते महावीर चौक अथवा एसकेएफ चौक मार्गे जाता येईल.

### पिंपरीतील वाहतूक बदल

» दुपारी चार ते रात्री बारा वाजेपर्यंत पिंपरीतील वाहतुकीत बदल असणार आहे. पिंपरी चौकाकडून शगुन चौकाकडे जाणारा मार्ग बंद राहणार असून पिंपरी पुलावरून उजवीकडे वळून भाटनगर मार्गे, मोरवाडी मार्गे एम्पायर इस्टेटच्या मदर टेरेसा पुलावरून काळेवाडी मार्गे जाता येईल. काळेवाडी पुल ते डिलक्स चौक, कराची चौकाकडे जाण्यास बंदी राहणार असून या मार्गावरील वाहतूक काळेवाडी पुलावरून उजवीकडे वळून जमतानी चौक व गेलार्ड चौकाकडून महात्मा फुले महाविद्यालय येथून उजव्या बाजूला वळून नव महाराष्ट्र शाळा येथून पुढे जातील. पिंपरी चौकातून गोकुळ हॉटेलकडे जाण्यास बंदी असून ही वाहतूक पिंपरी सेवा रस्त्याने क्रोमा शोरूम समोरील रस्त्याने जाईल. सर्जा हॉटेल ते पवनेश्वर मंदिर या मार्गावरील वाहतूक बंद राहणार असून ही वाहतूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पिंपरी येथून वळविण्यात आली आहे.

> “ मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी वाहतुकीचे चोख नियोजन केले आहे. अनेक मार्गांत बदल केले असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडण्यासाठी यंत्रणा सज्ज आहे. सर्वत्र कडेकोट बंदोबस्त नेमण्यात आला आहे. काही संशयास्पद आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.
>
> - संदीप डोईफोडे, पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा.

# भोसरीतील कृत्रिम धावमार्ग पुन्हा बंद!

## संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुलात नव्याने तयार केलेला कृत्रिम धावमार्ग (सिंथेटिक ट्रॅक) उखडल्याने पुन्हा बंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरीतील इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुलात चार कोटी रुपये खर्च करून नव्याने तयार केलेला कृत्रिम धावमार्ग (सिंथेटिक ट्रॅक) उखडल्याने पुन्हा बंद करण्यात आला आहे. दुरुस्तीसाठी हा धावमार्ग दोन महिने बंद राहणार आहे. त्यामुळे खेळाडूंकडून नाराजी व्यक्त केली जात आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील ॲथलेटिक्सचा सराव करणाऱ्या खेळाडूंना सरावासाठी इंद्रायणीनगरमधील एकमेव मैदान आहे. या ठिकाणचा चारशे मीटरचा आठ लेनचा कृत्रिम जुना धावमार्ग वर्षभरापूर्वी बदलण्यात आला. महापालिकेने चार कोटी रुपये खर्च करून हा नवीन धावमार्ग उभारला. १५ मार्च २०२४ रोजी एक वर्षानंतर खेळाडूंसाठी हा धावमार्ग खुला करण्यात आला. धावमार्गावर खेळाडू सराव करत असताना अवघ्या पाचच दिवसांत हा मार्ग उखडला होता. त्यामुळे दुरुस्तीसाठी हा धावमार्ग बंद करण्याची नामुष्की महापालिकेवर आली होती. जून महिन्यात या मैदानावर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या शिपाई पदाच्या पोलीस भरतीसाठी उमेदवारांची निवड क्षमता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर हा धावमार्ग पूर्णपणे उखडला असून जागोजोगी खड्डे पडले आहेत. त्यामुळे दुरुस्तीसाठी पुन्हा धावमार्ग बंद करण्यात आला आहे. परिणामी, खेळाडू सरावापासून वंचित राहत आहेत. सरावाअभावी खेळाडूंच्या कामागिरीवरही परिणाम झाला आहे.

याबाबत महापालिकेचे सह शहर अभियंता मनोज सेठिया म्हणाले की, दुरुस्तीसाठी धावमार्ग बंद ठेवण्यात आला आहे. पावसामुळे दुरुस्तीच्या कामात अडथळा येत आहे. त्यासाठी सलग १५ दिवस पावसाची उघडीप मिळणे आवश्यक आहे. दुरुस्तीसाठी दोन महिन्यांचा कालावधी लागेल. ठेकेदाराकडून दुरुस्ती करून घेतली जाणार आहे. ठेकेदाराचे ५० लाख रुपयांचे देयक दिले नाही. अनामत रक्कमही महापालिकेकडे आहे.

# ‘ससून’चा पैसा सगळे मिळून खाऊ!

## रुग्णालयाच्या तत्कालीन प्रशासकीय अधिकाऱ्यासह 16 कर्मचाऱ्यांनी 4 कोटी 18 लाख रुपयांचा अपहार केला

**पुणे | प्रतिनिधी**

ससून सर्वोपचार रुग्णालयातील गैरप्रकारांची मालिका सुरूच असून, आता मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. रुग्णालयाच्या तत्कालीन प्रशासकीय अधिकाऱ्यासह १६ कर्मचाऱ्यांनी ४ कोटी १८ लाख रुपयांचा अपहार केला आहे. या प्रकरणी वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने चौकशी केली होती. या चौकशी अहवालाच्या आधारे रुग्णालय प्रशासनाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, सर्व कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.




ससून रुग्णालयातील तत्कालीन प्रशासकीय अधिकारी अनिल माने हा या प्रकरणी मुख्य सूत्रधार आहे. त्याच्यासह एकूण २५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यात ससून रुग्णालयातील रोखपाल सुलक्षणा चाबुकस्वार, कक्षसेवक नीलेश शिंदे, अधिपरिचारिका सुमन वालकोळी, अधिपरिचारिका अर्चना अलोटकर, अधिपरिचारिका मंजूषा जगताप, वरिष्ठ लिपिक संतोष जोगदंड, कनिष्ठ लिपिक श्रीकांत श्रेष्ठ, वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक संदीप खरात, अधिपरिचारिका नंदिनी चांदेकर, अधिपरिचारिका सरिता लोहारे, सेवानिवृत्त सीटी स्कॅन तंत्रज्ञ उत्तम जाधव, सेवानिवृत्त आया सुनंदा भोसले यांचा समावेश आहे.

या गुन्ह्यात ससून रुग्णालयातून बदली होऊन बारामतीतील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वैद्यकीय महाविद्यालयात सध्या कार्यरत असलेला वरिष्ठ लिपिक सचिन ससार, वरिष्ठ लिपिक पूजा गराडे, वरिष्ठ लिपिक दीपक वालकोळी, वरिष्ठ लिपिक दयाराम कछोटिया यांचाही समावेश आहे. तसेच, सरिता शिर्के, संदेश पोटफोडे, अभिषेक भोसले, भारती काळे, अनिता शिंदे, सरिता अहिरे, शेखर कोलार, राखी शहा या खासगी व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पैसे नेमके कसे खाल्ले?

ससूनच्या प्रशासकीय अधिकारीपदाचा अतिरिक्त कार्यभार अनिल माने याच्याकडे असताना, जुलै २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत हा गैरव्यवहार झाला. या काळात प्रशासकीय अधिकाऱ्याच्या बँक खात्यातील व्यवहाराचे अधिकार माने याच्याकडे होते. या खात्यातील ४ कोटी १८ लाख रुपये त्याने रुग्णालयातील १६ कर्मचारी आणि ८ खासगी व्यक्तींच्या खात्यावर वेळोवेळी जमा केले. नंतर या कर्मचाऱ्यांनी हे पैसे एकाच कर्मचाऱ्याच्या खात्यावर पुन्हा जमा केले. या बदल्यात सर्व कर्मचाऱ्यांना ठरावीक रक्कम देण्यात आली, अशी माहिती सूत्रांनी दिली.

### वरिष्ठांचा वरदहस्त होता का?

ससूनमधील कर्मचाऱ्यांना वरिष्ठांचा वरदहस्त असल्याशिवाय एवढा मोठा गैरव्यवहार होणे शक्य नसल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या गैरव्यवहाराच्या कालावधीत अधिष्ठातापदी डॉ. संजीव ठाकूर आणि डॉ. विनायक काळे हे होते. त्यामुळे त्यांच्याकडेही संशयाची सुई वळली आहे. कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असली तरी या प्रकरणी वरिष्ठांचा सहभाग तपासावा, अशी मागणी ससूनमधून होत आहे.

**गैरव्यवहाराचा घटनाक्रम**

- कालावधी : जुलै २०२३ ते जानेवारी २०२४
- उघडकीस कधी : जुलै २०२४
- समिती स्थापना : ऑगस्ट २०२४
- समितीकडून चौकशी : ऑगस्ट २०२४
- कारवाई : सप्टेंबर २०२४

> ससूनमधील सरकारी रकमेचा अपहार उघडकीस आल्यानंतर या प्रकरणी वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने चौकशी समिती स्थापन केली होती. या चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे पोलिसांकडे कर्मचाऱ्यांविरुद्ध तक्रार दाखल करून त्यांचे निलंबन करण्यात आले आहे. रुग्णालयाच्या प्रशासकीय अधिकाऱ्याच्या बँक खात्याचे लेखापरीक्षण सुरू आहे.
>
> **- डॉ. एकनाथ पवार, अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय**

# अमेरिकेतील शिवशार्दूल पर्कशन्सच्या ढोल-ताशा गर्जनेची दशकपूर्ती

## केवळ सात ढोल आणि दोन ताशे एवढ्या मर्यादित वाद्यांच्या भांडवलावर सुरू झालेल्या पथकाने अल्पावधीत तमाम मिशिगनवासीयांना वेड लावले

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सव आणि ढोल-ताशावादन ही अस्सल मराठी मातीतली कला महाराष्ट्रापासून हजारो मैलांवर असलेल्या अमेरिकेतील मिशिगन राज्यात रुजवण्याचे काम ‘शिवशार्दूल पर्कशन्स’ या ढोल-ताशा पथकाने केले आहे. अस्सल पारंपरिक वादनाचा सात मजली गजर करत मराठी पताका उंच फडकावत ठेवणाऱ्या या पथकाची यंदा यशस्वी दशकपूर्ती होत आहे. या पथकाची ख्याती केवळ मिशिगन नव्हे, तर आसपासच्या सर्व राज्यात पसरली असून खास गणेशोत्सवाच्या निमित्ताने या पथकाचे वादन अनुभवण्यासाठी नेमाने येणारे कित्येकजण त्याची साक्ष देतात.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत ढोल आणि ताशा या मंगलवाद्यांना खास महत्त्व आहे. गणेशोत्सव हा ढोलताशाच्या वादनाशिवाय अपुरा वाटावा इतकी ही प्रथा मराठी मनात खोलवर रुजली आहे. कोणतीही परंपरा जिवंत ठेवण्यासाठी त्याविषयीचा अभिमान आणि प्रेम असणे पुरेसे नसते, तर तिची तोंडओळख पुढच्या पिढीला सातत्याने करून देणे तितकेच किंवा त्याहून अधिक महत्त्वाचे असते. याच तळमळीतून २०१४ मध्ये डेट्रॉईट येथे स्थायिक असलेले अनंत केंदळे यांनी पथकाची मुहूर्तमेढ रोवली. परदेशात दैनंदिन व्याप सांभाळून ढोलताशा पथक स्थापन करण्याचे शिवधनुष्य पेलणे अर्थातच सोपे नव्हते. मात्र अमाप इच्छाशक्तीच्या बळावर अनेक अडचणींना तोंड देत त्यांनी वेळोवेळी मार्ग काढत पथक जिवंत ठेवले. यामध्ये त्यांना अजित कुलकर्णी आणि तुषार देसले यांची



साथ मिळाली.

केवळ सात ढोल आणि दोन ताशे एवढ्या मर्यादित वाद्यांच्या भांडवलावर सुरू झालेल्या पथकाने अल्पावधीत तमाम मिशिगनवासीयांना वेड लावले. आजमितीला पथकाची ख्याती मिशिगनमध्ये सर्वदूर पसरलेली दिसते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काळात संयोजकांच्या आग्रहाला मान देऊन एका दिवसात तीन ते चार मिरवणुकांमध्ये वादन करण्याचे अनेक अनुभव पथकाच्या गाठीशी आहेत. प्रत्येक वादनाच्या सुरुवातीला होणारा शंखनाद, त्यानंतर ताशावर पडणाऱ्या काड्यांचा कडकडाट, आभाळाला गवसणी घालत नाचवले जाणारे भगवे ध्वज, अंगावर रोमांच आणणारी तुतारीची बुलंद ललकारी आणि त्यापाठोपाठ वाजणारे ढोल याने वातावरणात निर्माण होणारी स्पंदने केवळ शब्दातीत आहेत. करोना टाळेबंदीच्या काळात ऑनलाईन पद्धतीने वादन करून पथकाने आपले सातत्य टिकवून ठेवले. मराठीबरोबरच इतर भाषिकांनाही पथकाच्या सात मजली गजराने भुरळ घातली. पारंपरिक ढोलताशाच्या या जादूपासून स्थानिक अमेरिकन नागरिकसुद्धा लांब राहू शकले नाही. भाषा, प्रांत आणि समाजाची सर्व बंधने पार करून परदेशात लोकाश्रय प्राप्त करणे ही अभिमानास्पद बाब आहे.

**ताजेपणा जपण्यासाठी नवे प्रयोग**

कलेतील ताजेपणा जपण्यासाठी त्यात नवनवे प्रयोग करत राहणे अत्यावश्यक असते. पथकाच्या वादनात पारंपरिकेबरोबरच तरुणाईला भावतील असे नवीन प्रयोग केले. सात-आठ वर्षांच्या मुलापासून ते ज्येष्ठ नागरिक असे ७० हून अधिक वादक आपुलकीने पथकासोबत जोडले गेले आहेत. भारताच्या ७५व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून न्यूयॉर्कमध्ये आयोजित केलेल्या भव्य मिरवणुकीत पथकाने हजेरी लावून शेकडो उपस्थितांची मने जिंकली. एवढेच नव्हे, तर डेट्रॉईट येथील जन्माष्टमीच्या उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी आग्रहाने पथकाला दर वर्षी आमंत्रित केले जाते, असे अनंत केंदळे यांनी सांगितले.